महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई या कार्यालयास सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी योजनांतर्गत अनुदान वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः बियुडी २०१८/प्र.क्र.३१/का.४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: २४.०१.२०१८

वाचा -

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक : अर्थसं २०१७/प्रक्र.७५/अर्थसंकल्प-३, दि.१८ एप्रिल, २०१७

२) शासन परिपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग अविवि २०१७/प्रक्र.३१/का.४, दि.१९ एप्रिल, २०१७

३) शासन पूरकत्रक, वित्त विभाग, अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७

४) शासन पूरकत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, अविवि २०१७/प्रक्र.३१/का.४, दि.१८.८.२०१७,

५) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, उसाअ २०१७/प्रक्र.६८/उसाअ, दि.०४.०१.२०१८,

प्रस्तावना -

राज्यात उर्दू भाषेचा विकास, संवर्धन, प्रगती तसेच उर्दू व मराठी भाषेतील साहित्यिकांमध्ये वैचारीक आदान प्रदान होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीमार्फत विविध कार्यक्रम राबविण्यासाठी वरील संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये रु.७०.०० लाख इतके अनुदान खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदानित करण्यात आली आहे. त्यानुसार वर्ष २०१७-१८ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीसाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर असलेल्या अनुदानापैकी ७० टक्के इतक्या मर्यादेपर्यंत अनुदान वितरीत करण्यास वरील संदर्भ क्र.३ व ४ येथील शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर बाब विचारात घेता, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीला विविध कार्यक्रम राबविण्याकरिता सन २०१७-१८ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या रु.१,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) अनुदानापैकी रु.७०,००,०००/- (रु.सत्तर लाख फक्त) इतके योजनांतर्गत अनुदान महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबईचा खर्च विहित मर्यादेत राहील याची त्यांनी दक्षता घ्यावी.

२. सदर रकमेचा ईसीएस (E.C.S.) अवर सचिव(१), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या नावाने काढण्यात यावा.

३. उपरोक्त खर्च "मागणी क्र.झेडई-०१, २२३५,सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम ०१- अल्पसंख्याकांना सहाय्य, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (२३) महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीच्या विविध योजनांसाठी सहाय्यक अनुदान राज्य योजनेअंतर्गत योजना (२२३५ बी ०९४) ३१ सहाय्यक अनुदान" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई यांनी सदर खर्चाचे तपशील व निधीचे विनियोगाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर करणे अनिवार्य राहील.

५. हे शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७ अन्वये प्राप्त मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२४१३२११७७२१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Farooq Ahmed Noorkhan Pathan

Digitally signed by Farooq Ahmed Noorkhan Pathan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8710a75e5d45e9ece43bf14a0466b5933cf850802ac2a6564bc406784d303439, serialNumber=587f2890baec1d472c7d603da44bbe3ab165e637d985e3d5faab6d295ffa3a45, cn=Farooq Ahmed Noorkhan Pathan
Date: 2018.01.24 15:58:56 +05'30'

(फा.नू. पठाण)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
२ महालेखापाल १/२ (लेखा परिक्षा), (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/नागपूर,
३ संचालक, लेखा व कोषागारे (संगणक कक्ष), नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई,
४ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५ अवर सचिव /कक्ष अधिकारी (का.७), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
६ अवर सचिव (का.४), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
७ खाजगी सचिव, मा.मंत्री/मा.राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास, मंत्रालय, मुंबई.
८ कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई (अकादमीच्या कार्यालयामार्फत)
९ कक्ष अधिकारी (का.४), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१० रोख शाखा, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. (२ प्रतीत)
११ अधिक्षक नि कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई.
१२ कार्यासन-४, संग्रहार्थ.